# कविवर्य दामोदर अच्युत कारे यांचा काव्याविष्कार

- डॉ. सु. म. तडकोडकर

गोवा हा भारताच्या पश्चिम तटावर स्थित असलेल्या कोंकण प्रदेशातील चिमुकला भूमिभाग होय. कोची - मंगळूरपासून कारवारपर्यंत आणि सावंतवाडीपासून वसईपर्यंत पसरलेल्या विशाल कोंकण प्रदेशाच्या मध्यभागी गोवा (गोमन्तपुरी) हा नंदनवन तसेच तीर्थस्थळ म्हणूनच नावारुपाला आला होता.तो पोर्तुगीजांच्या धार्मिक, आर्थिक आणि राजकीय स्वरूपाच्या अनन्वित अत्याचारांमुळे, भाषा, धर्मादी सांस्कृतिक समतत्त्व असूनदेखील, कोंकण प्रदेशापासून तुटला. भारतीय उपखण्डापासून सहस्त्रावधी कोसावर असलेल्या प्रदेशातून आलेल्या परकी अधिसत्तेने साडेचारशे वर्षे हा प्रदेश स्वतःच्या मुठीत ठेवला. स्वातंत्र्यसैनिकांनी सर्व प्रकारची शक्ती पणाला लावूनही ही अधिसत्ता क्षीण होत नव्हती. मूळ भूमीत असूनही गोव्याला, त्याने भारतीयत्वाशी एकरूप होऊन राहू नये म्हणून, त्याला स्वतःच्या सांस्कृतिक परंपरेपासून तोडण्यासाठी त्याच्यावर साम - दाम - दण्ड - भेद स्वरूपाचे शासन करणाऱ्या पोर्तुगीजांच्या अधिसत्तेला नष्ट करता यावे म्हणून सरतेशेवटी, भारतीय सेनेने हस्तक्षेप केला. तो १९ डिसेंबर १९६१ या दिवशी मुक्त झाला. त्यामुळे या चिमुकल्या, गोजिरवाण्या सांस्कृतिक ठेव्याला पुनश्च मोकळा श्वास घेण्यासाठी अवकाश प्राप्त झाला.

या मुक्तिपूर्व काळात गोव्याने मराठीशी नाते ठेवले. या प्रदेशाने मराठीत लेखन - वाचन केले. गोव्यातील धार्मिक संस्था मराठीतून कार्यभार पाहू लागल्या. पोर्तुगीजांच्या सांस्कृतिक आक्रमणाला सामोरे जाण्यासाठी

अस्मिता जपण्याचा हा एक अभिनव मार्ग होता. गोव्यातील भाविकांना मराठीतील सन्तसाहित्याविषयीचे अगत्य वाटण्याचे ते एक महत्त्वाचे कारण होते. संतश्रेष्ठ सोहिरोबानाथ आम्बिये, कृष्णभट बांदकर यांनी मराठी वाङ्मयाच्या परिसरात स्वतंत्र स्वरूपाचे लेखन करून स्वतःची नाममुद्राही उमटवली. कविवर्य कृष्णदास श्यामा यांनी एकनाथांच्यापूर्वी भागवताचे मराठी भाषान्तर करून स्वतःच्या प्रतिभेची व प्रज्ञेची क्षमता दाखवून दिली.

इतकेच नव्हे तर एकोणिसाव्या शतकापासून मध्यवर्ती मराठी साहित्याविष्कारात गोव्यातील कवी, लेखक स्वतःचे योगदान करू लागले. गोव्यातील कलंगूट येथील विद्वान माधव चंद्रोबा व अनन्त चंद्रोबा या डुकले बंधूंनी १८६० त 'सर्वसंग्राह्य'द्वारे मध्ययुगीन मराठी काव्याचे संकलन – संपादन – प्रकाशन केले. या व इतर अनुबन्धांसंबंधी तपशीलवारपणे लिहिण्यासाठी शेकडो पृष्ठांचा ऐवज उपलब्ध करून देता येण्यासारखा आहे.

पोर्तुगीजांच्या अस्तित्वाचा परिणाम गोव्यातील मराठी लेखनावर झाला. तो बहुतेकांना टाळता आला नाही (किंबहुना तो टाळावा, असे वाटलेली नाही!). अशा रितीने संतसाहित्याचा तसेच पाश्चात्य सांस्कृतिक जीवनाचा ठसा उमटवू शकणाऱ्या दोन्ही परंपरा कविश्रेष्ठ बाळकृष्ण भगवंत उपाख्य बाकीबाब बोरकरांपासून पुढील बहुतांशी कवींच्या वाढीला उपयुक्त ठरल्या. या काळात स्वतःच्या शांत – शालीन – स्निग्ध स्वभावाच्या साह्याने मराठी कवितेला उर्ज्जस्वल आभा देणाऱ्या परंतु पाश्चात्य सांस्कृतिक जीवनाविषयीचा उल्लेख कटाक्षाने टाळणाऱ्या दामोदर अच्युत कारे (मार्च ०४, १९०९ ते सप्टेंबर २३, १९८५) यांच्या कवितेचा महत्त्वाचा वाटा आहे. बोरकर (नोव्हेंबर ३०, १९१० ते ०८, १९८५) गेले. त्यांच्यामागोमाग कारेही गेले. त्यामुळे एका मागोमाग गोव्यातील मराठी कवितालेखनातील महत्त्वाचे जितेजागते दुवे निखळले.

कारे यांचा जन्म गोव्यातील सांगे महालात असलेल्या व सावर्डे – कुडचडे या अर्धनागरी भूभागास निकट असलेल्या काकोडे या ग्रामातील त्यांच्या आजोळी झाला. आरंभी फोंडा महालातील कवळे परिसरात व नंतर सासष्टी महालातील मडगाव येथील दामोदर विद्यालयात त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. त्यांचे प्राथमिक स्वरुपाचे मराठीतून अध्ययन झाल्यानंतर काऱ्यांनी पुढील इंग्रजीतील शिक्षणाच्या चार इयत्ताही पूर्ण केल्या. १९२५ पर्यंत पोर्तुगीज लिसेव परीक्षेशी निगडीत असे (प्रिमैरग्राव, सेगुन्दग्राव वगैर) तीन वर्षांचे शिक्षण आले. घरातील सुसंस्कृत वळण असल्याने इतर स्वरूपाचे संस्कारसंपन्न होण्यास आवश्यक असे लेखन – वाचन होऊ शकले.

या संपदेच्या आधारे ते केवळ अठराव्या वर्षी गोव्यातील दत्ता वंकटेश पै यांच्या संपादकत्वाखाली १९२४ पासून प्रसिद्ध होऊ लागलेल्या पोर्तुगीजांच्या दमनतंत्राच्या विरोधात संघर्षरत असलेल्या 'हिंदू' नामक नियतकालिकात उपसंपादकपदी नेमणूक झाली. पुरुषोत्तम श्रीनिवास सुकेरकर यांनी हे साप्ताहिक प्रसिद्ध करण्यास आरंभ केला होता. कारे या नियतकालिकात साहित्यपरीक्षणे करीत तसेच वृत्तिगांभिर्यपूर्वक

व्यवस्थापकीय कार्यकाजही पाहत. १९२७ त त्या नियतकालिकाचे प्रकाशन पोर्तुगीजांच्या क्रोधामुळे स्थगित करावे लागले. एरव्ही ही नियतकालिकाच्या स्वभावाशी कारे यांची भाववृत्ती जुळू शकली नसती. कारे इतके सौम्य स्वभावाचे होते की काव्याशी निगडित असलेल्या वृत्तांची वा छंदांची कर्णकटू नावे देखील त्यांना क्लेष देत असत. या संदर्भात पुढील नोंद महत्त्वाची वाटायला हवी.

माधव त्र्यंबक पटवर्धनांनी (अर्थात कवीवर्य 'माधव जुलियन' यांनी) त्यांच्या 'छंदोरचने'त 'सुरेख संगम किती' या चालीवरील जातिरचनेला 'शुर्पणखा' असे संबोधले होते. काऱ्यांनी त्याच जाती रचनेला 'संगम' हे संबोधन दिले. कारण काय तर 'शुर्पणखा' हे संबोधन त्यांच्या स्वतःच्या कोमल सौंदर्यबुद्धीला रुचण्यासारखे नव्हते.

तद्वत त्यांना 'हिंदू'च्या तत्त्वांचे विशेष आकर्षण वाटले नसावे. तथापि त्यांना मुद्रणकलेची मात्र जवळीक वाटली असावी. त्यांनी सासष्टी महालातील मडगाव येथील श्री हरिमंदिराच्या निकट 'गोमन्त छापखाना' घातला व सुबक व शुद्ध मुद्रण करण्याचा आदर्श निर्माण केला. त्यांच्याशी तुलना करू शकणारे गोव्यातील पणजीत 'सदानंद मुद्रणालय' होते. तिथे पु. शि. रेगे, लक्ष्णणराव सरदेसाई, शंकर रामाणी यांची पुस्तके प्रकाशित झाली होती.

या निमित्ताने तत्पूर्वीच्या काळातील काही घटनांच्या संदर्भातील माहिती नोंदविणे आवश्यक ठरते.

कवी काऱ्यांचे तीर्थरूप अच्युतबाब कारे बाकीबाब बोरकर यांच्या घरी निवांतपणे लेखन करता यावे म्हणून निवास करीत असत. या संदर्भात बोरकर लिहितात,

''माडीवर दिवसरात्र ते आपल्या लेखनात निमग्न असत. मला त्यांच्या दिमतीला देण्यात आले होते. कधीकधी आपल्या मुलाच्या हुषारीच्या गोष्टी ते अभिमानाने मला सांगत. 'केरळकोकीळ' मधले आपले लेख मला दाखवीत. गुरूवर्य (सर डॉ. रामकृष्ण गोपाळ) भाण्डारकरांशी संस्कृत व्याकरणाविषयी आपले कोणते मतभेद आहेत तेही सांगत.... पुढे आमच्याकडच्या मुक्कामात ते फार आजारी झाले आणि त्या निमित्ताने आलेल्या (दा. अ.) काऱ्यांशी पहिल्याच रात्री माझा स्नेह जमला.सारी रात्र आम्ही एकमेकांना आपल्या कविता म्हणून दाखविल्या.''

काऱ्यांच्या घरात 'केरळकोकीळ' हे नियतकालिक नियमितपणे येत होते. एवढेच नव्हे तर त्यात त्यांचे तीर्थरूप लेखनदेखील करीत असत. 'केरळकोकीळ'च्या संदर्भात जो लौकीक होता तो ध्यानात घेतल्यास काऱ्यांच्या काव्यलेखनाची पार्श्वभूमी स्पष्ट होत जाते. या नियतकालिकाव्यतिरिक्त 'किर्लोस्कर खबर', 'चित्रमयजगत', 'मनोरजन' ही सुप्रसिद्ध नियतकालिकेही घरात येत असत. घरातील साहित्यलेखनास पोषक असे वातावरण होते. त्यांचे वडील घरात वाचनासाठीचे उत्तमोत्तम ग्रंथ आणत असत. काऱ्यांची मातोश्री त्यांच्या वयाची तीन वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच वारली होती. त्यांना त्यांच्या पुत्राविषयीचे ममत्व कोणत्या कारणात

दडलेले होते, तेही स्पष्ट होते.

किशोरवयातील ऋजू आणि सौजन्यशील काऱ्यांना वडिलांच्या आचरणातील हे ममत्व कळाले असावे. ते स्वतःच्या वडिलांच्या संदर्भात पुढीलप्रमाणे नोंद करतात.

'माझ्या लहानपणी माझे वडील बहुतेक वेळ फिरतीवर असत. माझी आई मी तीन वर्षांचा होण्यापूर्वीच निधन पावली होती. त्यामुळे वडिलांना घराशी बांधून ठेवणारा मजबूत पाश राहिला नव्हता. मधून मधून माझी विचारपूस करून माझ्या शिक्षणाबाबत काही व्यवस्था करण्याकरिता ते घरी येत आणि पुन्हा आपल्या निरुद्देश भ्रमन्तीवर जात. अशा प्रवासात ते कधी कधी आपल्या आप्तस्वकीयांकडे किंवा परिचयाच्या गृहस्थांकडे मुक्काम करीत. एकदा ते बोरकरांच्या घरी उतरले. बोरकरांच्या चुलत भावाने त्यांची शुश्रूषा करून त्यांना बरे केले. बोरकरांच्या वडिलांकडून मडगावला मला निरोप आल्यामुळे मी त्यांच्याकडे गेलो. गृहस्थाश्रमधर्माचे सोज्वळ भावनेने पालन करताना बोरकरांच्या घरच्या मंडळीने माझ्या वडिलांसाठी जे जे केले ते कळून आल्यावर मी भारावून गेलो. बोरकरांशी व त्यांच्या कुटुंबियांशी एक प्रकारे ऋणानुबंध जडल्यासारखे मला वाटले. आम्ही (बाकीबाब व मी असे) दोघे त्यावेळी या सर्व बाबींचे काऱ्यांच्या चित्तामनावर झालेले संस्कार पोषकच होते. आम्ही दोघे त्यावेळी चौदा – पंधरा वर्षे वयाचे होतो.

बोरकर धारवाडहून काऱ्यांना पत्रे लिहीत असत. ते गोव्याला परत आल्यानंतर काऱ्यांशी असलेली मैत्रीचा धागा पुनश्च साधला गेला. स्वतःच्या चित्तातील कवीला समानधर्मा लाभल्यानंतर त्यांचे व्यक्तिमत्व समृद्ध होत असल्याची जाणीव काऱ्यांना होत असावी. ते या संदर्भात म्हणतात

''त्यावेळेपासून पुढे सतत १९४६ पर्यंत त्यांच्या कवितेत झालेल्या अवस्थांतराचे जवळून निरीक्षण करण्याची मला संधी मिळाली. या काळात बोरकरांच्या आणि माझ्या एकत्र बैठका अनेकदा झाल्या आणि त्यात आम्ही सौहार्दाच्या आणि साहित्यविचारांची अमाप देवघेव केली. पुढे पुढे आमच्या बैठकांत साहित्यचर्चेला प्राधान्य मिळू लागले. ही चर्चा एका दृष्टीने पाहता सृजनशील होती असे म्हणता येईल. आम्ही एकमेकांच्या सहवासात आलो की लौकिकाचे आमचे भान सुटत असे आणि साहित्याच्या एका अलौकिक विश्वात आम्ही प्रवेश करीत असू. आमच्या मनःशक्ती अधिक तरल झाल्याची प्रतीती आम्हाला येत असे आणि चर्चाविषय झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करणारे विचार उत्स्फूर्तपणे आम्हाला सुचत आहेत असा भास होई. अर्थात पुष्कळदा वस्तुस्थिती अशी असे की, आम्ही वाचलेल्या पुस्तकातील विचारांचे ते पडसाद असत आणि आमच्या अनुभूतींतून त्याला एखादा नवा पदर जोडल्याचे श्रेय किंवा समाधान तेवढे आमचे असे. हळूहळू आमच्या चर्चेला एक उद्दीष्ट प्राप्त झाले. आमचे साहित्यिक व्यक्तिमत्व दिवसेंदिवस अधिकाधिक संपन्न होत जावे आणि आमच्या पुढील साहित्यविषयक आदर्शही विकसित आणि उन्नत होत रहावा म्हणून आपण सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे याची आम्हाला जाणीव झाली होती. त्यामुळे आमच्या वाचनात आलेली जी पुस्तके त्या दृष्टीने आम्हाला उपकारक होतील असे आम्हाला वाटे ती वाचण्याची आम्ही एकमेकांना शिफारस करीत असू. आमची काव्यविषयक कल्पना आणि कलादृष्टी अधिक अव्यंग,

अधिक निर्दोष व्हायला हवी. याची आम्हाला जाण आली होती आणि त्यासाठी व विश्वसाहित्यातील काव्यकृती आणि कलाविचार आपण अभ्यासिले पाहिजेत, असाही एक संकल्प आम्ही त्यावेळी केला होता.

'या चर्चांच्या ओघात आम्ही कलामूल्यांचाही अधूनमधून विचार करीत असू. मराठी कवितेचे गुणग्रहण करताना कलाबाह्य मूल्यांवर अप्रस्तुत भर देण्याची एक प्रथा त्यावेळी पडली होती. त्याबद्दल आम्हाला खंत वाटे. कलामूल्यांपासून अधूनमधून विचार करीत असू. मराठी कवितेचे गुणग्रहण करताना कालबाह्य मूल्यांवर अप्रस्तुत भर देण्याची एक प्रथा त्यावेळी पडली होती. त्याबद्दल आम्हाला खंत वाटे. कलामूल्यांपासून कलाबाह्य मूल्ये वेगळी काढली पाहिजेत, असा विचार आज निकराने, हिरीरीने मांडला जातो. एवढी या विषयाची निकड आम्हाला त्यावेळी जाणवली नव्हती आणि तेवढ्या डोळसपणाने विचार करण्यापर्यंतही आमची मजल तेव्हा गेली नव्हती. पण ज्या अनेक मुद्यांचा अलिकडच्या टीकाकारांच्या किंवा विचारकांच्या लेखनात उपन्यास झाला आहे त्यातले कित्येक मुद्दे आमच्या चर्चेत येऊन गेले होते. या विषयांचा आमच्याकडून विशेष पाठपुरावा झाला नाही, हे बऱ्याच अंशी साहजिकच होते. समकालीन विचारसरणीतून फार पुढे धाव घेण्यासारखे ते त्यावेळी वाटत होते...

''बोरकरांना त्यावेळेपासून सुरेल काव्यगायनाची हातोटी साधली होती. त्यांच्या काव्यदृष्ट्या सरस अशा कवितांना त्यांच्या स्वरझंकाराची जोड मिळाली की त्या श्रोत्यांवर अधिक प्रभाव टाकीत. स्वतःला लाभलेल्या या देणगीचा फायदा त्यांनी स्नेहभावाने मलाही अनेकदा मिळवून दिला.

**'नादात गुंगसी जे। शब्दांत सांग बाले।'**

या ओळीने सुरू होणारी त्यांची एक कविता होती आणि त्या कवितेतल्या प्रसंगाकडे एका वेगळ्या भूमिकेतून पाहता येण्यासारखे आहे हे दाखवून देण्यासाठी

**'निःस्तब्ध रहा क्षणिं या, प्रणया। मौनात बोलु दे निज हृदया।'**

ही माझी कविता लिहिली गेली होती. बोरकरांनाही ती फार आवडली होती. अनेक प्रसंगी या दोन कविता बोरकरांनी द्वंद्वगीतासारख्या गाऊन दाखविल्या तेव्हा श्रोत्यांवर त्यांची मोहिनी पडली.''

हा संदर्भ बोरकरांच्या 'प्रणयमुग्धेस' व काऱ्यांच्या 'संगीत परिणती' या दोन्ही कवितांशी लावून घेता येतो.

''१९२३ साली आम्ही, एकमेकांच्या सोबतीने, कोल्हापूरच्या साहित्यसंमेलनाला गेलो होतो. त्या संमेलनात काव्यगायनाच्या एका खासगी बैठकीत कविवर्य तांब्यांनी या दोन्ही कविता ऐकल्या. तेव्हा त्यांनाही त्या फारच आवडल्या. अशा रीतीने माझी ती कविता अनेक रसिकांपर्यंत पोचून तिचे गुणग्रहण झाले. त्याला बोरकरांचे काव्यगायन कारणीभूत झाले.''

काऱ्यांनी आपल्या कविमित्रास उद्देशून ती कविता लिहिली आहे, ती वाचल्यानंतर काव्यबंध व मित्रबंध

यातून सुरेखसा अनुबंध निर्माण झाला आहे याची प्रचिती येऊ शकते. कवी 'कविमित्रास' या कवितेत म्हणतो :

**धाडिसी काव्यान्तरीं तूं बिम्बवोनी अन्तराला**
**वाचुनी चित्तांत माझ्या खेळली कल्लोलमाला**
**ठाकली नेत्रांसमोरी ती तुझी मूर्ती रसेली**
**नेहमी काव्यात्मतेच्या स्वीय रंगीं रंगलेली**

**देह संसारीं परन्तू स्वप्नराज्यां चित्त खेळे**
**दाखवीती नेत्र तूझे गुंगिनें ते माखलेले!**
**ज्या घडी संगीं तुझ्या मी सौख्यदायी घालवील्या**
**दीप्त होती तत्स्मृतींच्या ज्योति कालें मालवील्या**

वरील प्रदीर्घ अवतरणांकित माहितीमुळे काऱ्यांच्या काव्यलेखनाला कशी मिती लाभत गेली, या विषयीचा कयास करता येतो. काऱ्यांनी बोरकरांच्या कवितेहून वेगळी सौम्य भाववृत्तीची कविता लिहिली. 'हृदयमंदिर' ही दिनांक सप्टेम्बर २०, १९२५ या दिवशी लिहिलेली पुढील कविता त्या प्रकाराचे प्रतिनिधित्व करते, असे म्हणता येईल.

**हे पहा उघडिले हृदयमंदिर द्वारा**
**चल! आत शिरोनी गाजव तव अधिकार!**
**हे प्रेम–भक्तीचे स्निग्ध दीप उजळिले**
**दिव्यता प्रभेने मंदिर कोंदुनि गेले!**
**गुंफिली सुनिर्मल भावसुमांची माला**

**अणू – अणूत आदर – सौरभ हा दरवळला!**
**बघ उत्सुक दारी उभे ठाकले चित्त**
**तव आगमनाची असे प्रतिक्षा करित!**
**ये! होई अधिष्ठित हृदयमंदिरी मम या**
**करि पावन त्याला पदस्पर्शे तुझिया!**

काऱ्यांची कविता 'ज्योत्सा, 'प्रतिभा', 'पारिजात', 'यशवन्त', 'रत्नाकर', 'वागीश्वरी' या मासिकांतून प्रकाशित होऊ लागली होती. गोव्यातील कण्टक यांचया 'सुबोध'मध्येही त्यांची कविता प्रसिद्ध झाली होती.

कारे यांनी 'दा. अ. कारे' या नाममुद्रेने छन्दोबद्ध काव्यलेखन केले. बोरकर व कारे हे समकालीन.

बोरकरांचा प्रथम काव्यसंग्रह 'प्रतिभा' १९३० त प्रकाशित झाला तर काऱ्यांचा 'नन्दादीप' हा ५८ कवितांचा एकमेव काव्यसंग्रह १९३४ त वाचकांच्या भेटीला आला. मुंबईच्या काशिनाथ श्रीधर नायक यांनी त्यांच्या गिरगावमधील 'गोमन्तक' मुद्रणालयाच्या वतीने हा संग्रह प्रकाशित केला होता. त्यात १९२५ पासूनच्या कविता संग्रहीत झाल्या आहेत. सुप्रसिद्ध गोमंतकीय चित्रकाल चिमुलकर यांनी या संग्रहाचे मुखपृष्ठ सजविले होते.

ज्येष्ठ कादंबरीकार वामन मल्हार जोशींनी 'नन्दादीप'ला प्रस्तावना लिहिताना काऱ्यांच्या कवितेतील शुद्ध, सरल व प्रासादयुक्त भाषा, कल्पनाशक्तीचा सुरम्य विलास, त्यांना लाभलेली सुरम्य व सात्त्विक भावनांची जोड, त्यांची अकृत्रिम निसर्गभक्ती व मुख्य म्हणजे अन्तःकरणपूर्वता या पाच गुणवैशिष्ट्यांची नोंद केली आहे.

काऱ्यांच्या कवितेला प्रतिभेचे अन प्रज्ञेचेही वरदान लाभले आहे. ते १९२८ ला मडगावी लिहिलेल्या या शार्दूलविक्रीडित वृत्तातील 'प्रतिभेस –' या कवितेत प्रतिभेच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट करतात.

**सृष्टीच्या हृदयान्तरी शिरुनियां गूढें तिचीं सोडणें**
**स्वर्गाची रमणीयता अनुपमा पृथ्वीप्रती आणणें।**

या कवीला बोरकरांप्रमाणेच प्रतिभेस आवाहन करावेसे वाटते.

**घालीं हा व्यवहार पाश अपुले माझ्या जिवाभोवतीं**
**होई यास्तव प्रेमले! तुजकडे दुर्लक्ष माझें अती,**
**ठावें हें, हृदयास या कितितरी होतीं तयें यातना!**
**कैसें हाय करूं परी? अडकला हा जीव फासांत ना?**

बोरकर १९३० लिहिलेल्या या कवितेत म्हणतात :

**स्वैर करीं संचार! प्रतिभे!**
**स्वैर करीं संचार**
**तव नांवावर, तव सेवेवर**
**हा माझा संसार**

बोरकरांप्रमाणे काऱ्यांनाही तिची निरंकुश सत्ता मान्य आहे. ते म्हणतात :

**सत्ता चालतसे तुझी, हृदयीं माझ्या सदाची परी!**

काऱ्यांना बुद्धी संसारपाशात अटकून पडत असल्याचे जाणवते –

**चित्तीं घे : – 'जरि बुद्धी गुन्तुनि उरे संसारपाशान्तरीं...**

बोरकरांनाही जवळ जवळ तीच भावना ग्रस्त करते. ते या संदर्भात म्हणतात –

**परी येथला बंध ओढिते**
**दु:सह मजला फार**

काऱ्यांच्या कवितेत निसर्ग, स्त्री, देश, जीव व शिव यांचे काव्यउपासनेसाठीचे पंचायतन आहे अन या कवीला एक प्रकारची आध्यात्मिक हुरहूर लागली आहे, असे नोंदविले गेले आहे. त्यांच्या कवितेत कवीचा तारुण्यसुलभ कल्पनाविलास आढळतो. परन्तु हा कवी व्याकरणाच्या नियमांकडे दुर्लक्ष करण्याइतका बंडखोर वगैरे नाहीये, यासाठी जोशींनी काऱ्यांचे अभिनंदन केले होते. तसेच त्यांनी या कवीच्या रचनेत पावित्र्य, भाविकता, शीतलता, शुचिर्भूतपणा, सात्त्विकपणा, सौम्यपणा आढळतो याकडे सर्व रसिकांचे लक्ष वेधले होते. त्यासाठी पुढील कवितेचे उदाहरण घेता येते :

**नको तेजाची झळाळी**
**जननेत्र दिपवाया**
**ठेवी हृदयी ओलावा**
**ज्योत पायी जागवाया**
**तुज माला अर्पायाला जन किती**
**कोलाहल दारी तुझिया करिती**
**शिरावया तयामाजी**
**अधीर न हा होईल**
**परी प्रतिक्षा करीत**
**शांत अंतरे राहील**

एखाद्या अभ्यासकाला बोरकर व कारे यांच्या काव्याशयातील तौलनिक नोंदी कराव्याशा वाटल्या तर उभयतांत साधर्म्यापेक्षा विधर्म्यच अधिक आढळेल. बोरकरांनी पर-सवर्णांचा स्वीकार केल्याचे दिसत नाही तर काऱ्यांनी त्यांच्या काव्यरचनेत पर - सवर्णांना विपुल स्थान दिल्याचे ठसठशीतपणे जाणवते.

मुख्यत्वे काऱ्यांच्या काव्यात बोरकरांच्या काव्यातील (जपानी रमलाची रात्र) भोवळ आणणारा उन्मादकपणा नाहीये.

**करांतुनी तव खिदळत आले स्तनाकार पेले**
**जळता गंधक पाच उकळती यांहिं रंगलेले**
**अभिष्ट चिंतुनि आम्हीं त्यांचे भिडवियले काठ**
**सुरेहुनी तूं गडे भाजिले ओठांनीं ओठ**

असे म्हणणारे बोरकर काऱ्यांवर फारसा प्रभाव टाकू शकले नाहीत. काऱ्यांतील संयत स्वभावाच्या

कवीचे स्वर्गसुख उन्मादात एकवटलेले नाही. किंबहुना त्यात त्याला रसही नाही. काऱ्यांच्या 'अलक्षित प्रेम', 'मधुरतृप्ती', 'यौवन जागृती', 'लाजरी', 'सख्या रे', 'ये आता धावून', 'संगीत – परिणती' या कवितांत अनात्मतेचा प्रत्यय येऊ शकतो. तो 'उषःकाल' या कवितेत म्हणतो :

**मनीषा स्वर्गसौख्यांची**
**जराही अंतरी नाही**
**रुचे माझी सदा माते**
**धरा वैचित्र्यपूर्ण ही**
**फुले, वेली, नद्या, सिंधू**
**धरेला चित्रिती रंगी**
**इथे वर्णच्छटा नाना!**
**निळे सारेच त्या स्वर्गी**

कारे हे जरी निसर्गकवी असले तरी बालकवींप्रमाणे बालसुलभ कुतूहल त्यांच्या कवितेत आढळत नाही. बोरकरांच्या कवितेत गोव्यातील निसर्ग येतो तद्वत काऱ्यांच्याही कवितेत तोच निसर्ग येतो. परंतु तो उफाळत येत नाही. बोरकरांच्या कवितेतील दूधसागर

**हास्यीं तव वेदघोष**
**सृजनाचा दिव्य तोष**
**जीवनकल्लोळहर्ष वर्षवीं शुभंकरा**

असा कल्लोळ निर्माण करणारा आहे.

या दोघांनीही 'हिमालयास–' या शीर्षकाची कविता लिहिली आहे. दोन्ही कविता शार्दूलविक्रीडित वृत्तात आल्या आहेत. दोघांच्याही कविता मडगावातच लिहिल्या गेल्या आहेत. दोघांच्याही कविता हिमालयास संबोधणाऱ्या त्याचा गौरव करणाऱ्या आहेत. मात्र काऱ्यांनी त्यांची ही कविता मार्च १९२८ मध्ये लिहिली तर बोरकरांनी मे १९३४ मध्ये लिहिली होती. काऱ्यांनी त्यांच्या अकरा कडव्यात हिमालयाच्या हिमशुभ्र, नील, हिरवा, धुकाळ या व अशा काही वर्णाचे वर्णनकेले आहे. त्याच्या स्वभाववृत्तीविषयीची नोंद केली आहे. तसेच त्याच्याजवळ स्मृती जागवण्याची क्षमता असल्याचे दाखवून दिले आहे. काऱ्यांनी जसा हिमालयाच्या स्वभाववृत्तीचा उद्घोष केला तसा बोरकरांनीही केला आहे. तसेच हिमालयाजवळ स्मृती जागृत करण्याची क्षमता कधी प्रत्ययाला येईल, याविषयी पृच्छा केली आहे.

कारे हिमालयास संबोधताना म्हणतात –

**माथां निर्मल वर्ण, हिरवी सृष्टी फुले खालती**
**पाया लुप्त धुक्यांत, शुभ्र शिखरें तेजामधें नाहती!**
**ऐशी धीरगंभीर मूर्ति तव ही वृत्ती करी उन्मन**
**अज्ञातांत कुठए किती गत युगें लंघून नेई मन!**

बोरकर हिमालयास उद्देशून म्हणतात -

**केव्हा पाठविशील विस्मृत भल्या गेल्या दिसांचे ध्वनि**
**शास्त्रें, मंत्र, कथा पुनश्च सगळें भांडार धुंडाळुनी?**
**दातृत्वे अजुनीही थोर बहु हो मन्मातृभूकारणीं**
**तुझे वैभव, तेज, ओ सगळें आसेतु विस्तारुनी**

त्यांनी 'गोमन्तक - गीत' (१९२८) या शीर्षकाची पोवाड्याच्या चालीवर कविता लिहिती होती. ती श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या 'महाराष्ट्रगीता' इतकीच सरस आहे. या संदर्भात बोरकरांनीही 'महाराष्ट्रगीत' (१९२८) गायले होते याचे स्मरण होते. बोरकरांनीही गोमंतक गीत गायले होते. त्या कवितेचे शीर्षक 'मातृभूमीची भूपाळी' (१९३०) असे आहे.

**गोमंतकदेवते, प्रभातीं मानसपूजा वरीं**
**आमुची मानसपूजा वरीं**
**चित्स्फूर्तीचा वसंत तुजस्तव सत्सुमगजरा करी**

तसे पाहिले तर गोव्यातील या दोघा कवींच्या कवितालेखनात, विशेषतः काव्याच्या आशयाविष्कारात काही वेळा साम्य आढळते. काऱ्यांच्या 'गोमन्त-देवी' (१९२९) या कवितेत शेवटचे चरण पुढीलप्रमाणे आहेत

**तव सेवा - कार्य घडो मजहि अल्पसें**
**अंकित तव रूप असो हृदय-पटिं असें.**
**जीव-सुमन पूजेस्तव तवचि हें असे.**
**जाणिव ही देवि! वसो हृदयिं सर्वदा!**

काऱ्यांचे 'गोमन्त-देवी' हे गीतिकाव्य गोव्यातील मराठी विद्यालयांतून प्रार्थनेच्या कार्यक्रमात गायले जात असे.

निसर्गकविता लेखन ही काऱ्यांची मनसब आहे. 'गोमन्त-देवी' या कवितेतील पुढील वर्णन निसर्गाचे मानुषीकरण करू पाहतेच तसेच गोव्याचे वस्तुस्थितीतील भौगोलिक चित्रणही करू शकते.

**नारळितरु छत्र करी देवि! तुजवरी**
**दुग्धधार धरित दूधसागरहि शिरी**
**सिन्धुलहरि चुम्बिति तव चरण वरिवरी**
**वैभव तव अनुपमेय, अतुल सम्पदा**

**कुन्तलिं तव केतकि, वरि आम्रमंजरी**
**रजतधवल निर्झ पदिं पैंजणांपरी,**
**सोमुकुरिं निरखिसि निज रुपमाधुरी**
**उचित प्रसाधन–साधन राज्ञिच्या पदा!**

सरोवर हे एक दर्पणच होय व त्यात आपले रुपसौंदर्य पाहण्यामुळे तंद्रा लागली आहे. ही राणी चिरतरुण असून ती तारुण्यसुलभ भावमग्नतेत (सरोवराच्या दर्पणात) डुंबून गेली आहे. हा कल्पनाविष्कार केवळ अनुपमेयच होय. बालकवी प्रमाणेच काऱ्यांच्याही कवितेत निसर्गातील आल्हादमयता जाणवते. परन्तु त्यांना 'जगी या दुःख नांदोनी सुखाला देतसे गोडी' असा शोध लागतो. त्या आल्हाद देणाऱ्या अनुभवामुळे अधिक हुरहूर लागते पण तिला बव्हंशी आध्यात्मिकतेचा स्पर्श झालेला आहे. कारे म्हणतात :

**हुरहूर वाढे अंतरी काही न कळे मज काही**
**विश्वामाजी विलीन व्हाया आत्मा का पाही...**
**मुक्त करुनि मज अनंत हृदयी नेई वाहून...**

या आध्यात्मिक वृत्तीतूनच कवी स्वाभाविकपणे मानवी दुःखाचे कारण शोधू पाहतो. तो म्हणतो :

**मर्त्य लोकांचे जिवाला वेढिती हे बंध सारे;**
**आणि स्फूर्तीच्या पंखास...**
**खेची बांधुनि व्यवहार दोरी....**

स्वतःच्या आत्म्याला निरखून पाहताना कवी 'कविमित्रास–' या कवितेत म्हणतो :

**...कोणती रे तेथ नियती वाट माझी पाहताहे–**
**त्या भविष्याच्या तमिस्त्रीं, ठाऊकें आहें कुणा हें?**
**गंधदानाऐवजीं का औषधाला जावयाचें?**
**रानिंच्या कोनांतले हें फूल माझ्या जीवनाचे?**

प्राप्त परिस्थितीत या दुःखाला टाळण्याचे कवीच्या मनात येत नाही. तो देखील सहचरच होय. कवी म्हणतो :

**दुःख दैवी हा अतिथी**
**जेधवा दारात येई**
**पाठवू विन्मुख कैसा,**
**स्वागता गेहांत घेई**

जे दुःख मानवनिर्मित आहे, त्याचे गौरवीकरण करता येणार नाही. याविषयीचे भान कवीला आहे या संदर्भात 'भाताचे रोप' या कवितेचा निर्देश करता येतो. काऱ्यांतील कवी सामाजिक विषमतेचा विषय आला

की संवेदनाशील होतो. एका बाजूने श्रीमंती सुखोपचार देत निद्रिस्त आहे तरः

**कामकरी कुणी परी**
**रस्त्यावर खपती निथळत घाम**

बोरकरांच्या कवितेतील स्त्री 'वासंत उषा प्रभातसमयीं माता मला मंगला' अशी असून 'संध्यारंगतरंगसे स्वर तुझे शृंगारिती अंतरा' ('तूं') अशीही आहे. ती स्त्री विविधांगी भ्रम – विभ्रम निर्माण करणारी रमला आहे. मर्ढेकरांच्या काव्यातील स्त्री तर माऊली म्हणूनच सामोरी येते. कारे यांच्या कल्पनाविलासात विलासी स्त्रिच्या उन्मादक उपभोगाला स्थान नाहीये. ती आध्यात्मिकतेचे वरदान घेऊन येणारी अपार शक्ती आहे.

**नयनी नभी तुझ्या कृष्ण बाहुल्या**
**ढगापरी धरिती वीज आपुल्या...**
**प्रीतीगांनी गुंतता जीव घे उदात्तता**
**विश्वसंगीताचिया लयीत लीन होऊनी...**

ती स्त्री अपार शक्तीची असली तरी अशी संयत स्वभावाचीही आहे. कविची तिच्याविषयीच्या आसक्ती तितकीच संयमी स्वरूपाची आहे.

**माळ नको गुंफू मज गुंफ गळाभर**
**ही पुरे तुझी पूजा दुरुनी....**
**परि देव न मी, तुही न दासी**
**कधी येथील अंतर हे सरुनी**

असे संयतपणे विचारणारा प्रियकर आहे. 'सोक्षमोक्ष'मधील प्रणयचित्रण अत्यंत सूचक असल्याने तिच्यातील भावोत्कटतेलाही संयतपणाची झालर उलगडून राहते.

काऱ्यांच्या कवितेला जसा धपापणारा स्वर फारसा साहत नसावा तसा कल्पनेपलिकडच्या अवाजवी कल्पनाविलासाला, म्हणजे खळखळटाला, थिल्लरपणाला वाव लाभत नाही. तिला सामान्य जनजीवनातील क्लेषांविषयीचा कळवळा असला तरी सामान्यतः ती मानवी हलाखीच्या पोळण्यात घ्याव्या लागणाऱ्या अनुभवांपेक्षा, लौकिक जीवनानुभवांपेक्षा अलौकिकत्वाचा शोध घेण्यात अधिक निमग्न होताना दिसते. पण असे असले तरी ती कविता दैवाला बोल लावत नाही.

काऱ्यांच्या कवितेत उपमा – उत्प्रेक्षांची चित्रमालिका उमटत जाते. त्यांच्या 'हिमालयास' या कवितेतील

पुढील चलचित्र भावतन्द्राच निर्माण करू शकते:

**की व्योमांत विहार स्वैर करिती जीं देवदूतांपरी**
**शोभे निर्मलता मनी धवलता तैशीच देहावरी**
**वाहे प्रेमझरा उरांतुनि जणू तृष्णार्त – संजीवनी**

गंगा व सिन्ध हे जणू प्रेमौघ असून या प्रेमौघांनी जे नवनवे उन्मेषशाली ऐश्वर्य दिले आहे ते रक्षिणारा हिमालय हा जणू काही दिक्पालच आहे असा कल्पनाविलास निर्माण करण्यात कवीला यश लाभले आहे.

'गोमन्त-देवी' या कवितेत भूमीदेवतेची मूर्ती कल्पिताना कवी म्हणतो –

**सम्राज्ञीपद तुझेच गमत सृष्टीचे**
**सिंहासन सह्याद्री, खालिं गालिचे**
**अंथरिले हरित – धवल गवत – वाळुचे!**
**या प्रभावळीत भव्य पहुडशी सदा**

काऱ्यांनी शब्दचित्रे रेखाटण्यांतही कौशल्य दाखविले आहे. अत्युच्च शिखरावरून अधोमुख होऊन पाहू गेल्यास निसर्ग डोळ्यात सामावतो तो पुढील शब्दांत :

**रेषा रेखिव दृष्य दूर क्षितिजीं जी वर्तुलाकार ही**
**हे विस्तीर्ण अनन्त डोईवरती विस्तारले व्योमही**
**वाटोळे रविबिम्ब शांत जलधीपृष्ठावरी टेकले**
**सन्ध्यातेजहि धुन्दकारुनि दऱ्या आरक्त हे फांकले**

काऱ्यांनी विपुल काव्यलेखन केले. परंतु रसिकांच्या दुर्दैवाने त्यांच्या त्या काव्याविष्काराचे संकलित रूप अद्यापि प्रकाशित झाले नाही. काऱ्यांच्या कवितांचे किमान दोन संग्रह खचितच प्रकाशित होऊ शकतील इतक्या कविता त्यांनी लिहिल्या आहेत असे गोव्यातील साहित्यिक व संशोधक बाळकृष्ण दत्तात्रेय सातोस्कर यांनी त्यांच्या 'गोमंतकीय मराठी साहित्याचे आधुनिक शिल्पकार' (१९८४, पृष्ठ क्रमांक ५१) या ग्रंथाच्या द्वितीय खण्डात म्हटले आहे.

काऱ्यांच्या काव्यलेखनाचे प्रमुख रचनावैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या काव्याने पाश्चात्य संस्कारसंपन्न अशा बोरकरांच्या सहवासात राहूनही पाश्चात्य संस्कृतीचे परिणाम स्वतःवर उमटू दिले नाहीत. ते त्यांचे सत्व होय. असे असले तरी, यांच्या स्वभावातच अपार स्निग्धपणा असल्याने बहुधा, इतर संस्कृतींशी संघर्षरत राहण्याचे व्रत मात्र आढळत नाही.

काऱ्यांच्या काव्यलेखनाचे द्वितीय रचनावैशिष्ट्य म्हणजे त्यात संस्कृतप्रचुर मराठी शब्दांचे भाण्डारच आढळते. वस्तुस्थिती अशी होती की बोरकर संस्कृत शब्दांचा शोध घेत त्यांचा मौल्यवान रत्नांप्रमाणे साठा

करीत असले तरी उचित स्थळीच त्यांची कौशल्यपूर्ण शैलीत प्रतिष्ठापना करीत होते. काऱ्यांच्या काव्यात मात्र पारंपरिक संस्कृतीचे उद्घाटन करण्याच्या मिषाने हे संस्कृतप्रचुर शब्द अवतरत होते. परिणामी त्यांची 'हृन्मन्दिरा'तून आविष्कृत भावमधुर कविताही, आजच्या सवंग अशा हिंदी अरबी फारशी – उर्दू – इंग्रजी मिश्रित संवादांच्या आहारी गेलेल्या अन त्यामुळे स्वतःच्या सरळ – सुलेभ भाषेलाही पारखे झालेल्या वाचकाला क्लिष्ट असल्याचे वाटल्यास नवल ते कसले?

काऱ्यांच्या कवितात कोंकणी भाषेतील काही शब्द आढळतात. उदाहरणार्थ :

गीम (ग्रीष्म), दमळ (उन्हाळ्यातील ढगांमुळे निर्माण झालेले वातावरण), बावणे (कोमेजणे), मळब (आकाश), माड (नारळीचे वृक्ष), मेर (शेतातील आडवी – उभी मातीची शीर), वेळ (समुद्रावरील वाळूचा तट), साळीक (कमळे).

**कळ लागून मानेला शिर खाली झुकतसे**
**देठ बावतां साळीक अधोमुख होई जसें**

असे असले तरी काऱ्यांच्या कवितेला प्रादेशिकतेचा सोस नाही. त्यामुळेच बहुधा त्यांच्या 'गोमन्तक – गीता'त एकही कोंकणी शब्द आढळत नाही.

मात्र बोरकरांच्या कवितेत कैक कोंकणी शब्द आढळतात. उदाहरणार्थ : ओवळीं (बकुळी), गबा (केळीच्या झाडाच्या साली), तार (होडी, नाव), पुनव (पौर्णिमा), भिरीं (पक्ष्यांचा थवा), रुखावळ (झाडे) ही काही शब्दावली बोरकरांच्या कवितेत आगमन करते.

यातील कोंकणी शब्दांचे उपयोजन झाल्याने वामन मल्हारांनी रसहाना झाल्यासारखे वाटते. काव्यहानी ही व्यक्तिगणिक सापेक्ष असते काय? कारण प्रभाकर पाध्ये या मराठीतील सौंदर्यशास्त्रातील विचारवंतांचे मत वेगळेच होते.

कर्नाटक व गोवा या राज्यांच्या सीमेवर वसलेल्या बेळगाव (कर्नाटक राज्य – तत्कालीन म्हैसूर राज्य) नगरात १९५० या वर्षी गोमंतक मराठी साहित्य संमेलनाचे सहावे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. पाध्ये या संमेलनाचे अध्यक्षपदी निवडले गेले होते. पाध्येंनी मराठी व कोंकणी या दोन भाषांतील विद्वज्जड वादात शिरण्याचा स्वतःला अधिकार नाही, याकडे संबंधितांचे लक्ष वेधले. मात्र गोमंतकातील मराठी साहित्याविषयीचे आपदकार्य या विषयाशी संबंधित विचार मांडताना ते म्हणाले, 'पण कोंकणीच्या दुधावर पोसलेले गोमंतकीय मराठी लेखक तरी या तथोक्त विसंवादावर विश्वास ठेवणार नाहीत. त्यांनी आपल्या मराठी लेखनांत कोंकणीचा अधिक उपयोग करावा आणि या विसंवादाच्या प्रवादाचें मूळच उपटून टाकावे असे मी म्हणेन.'

वामन मल्हार जोशी हे पाध्येंना अत्यंत निकट होते. परंतु विचारप्रकट करण्याच्या वेळी हे निकटतव् त्यांना

अडथळ्यासारखे वाटले नाही. ते त्या भाषणात म्हणाले,

''काव्यांत कोंकणी शब्दांचा फार उपयोग करण्यात श्री. वा. म. जोशी आणि श्री. वि. स. खांडेकर यांनी विरोध दर्शविला आहे. (दामोदर अच्युत कारे यांचा कविता संग्रह 'नन्दादीप' व बाळकृष्ण भगवन्त बोरकर यांचा कविता संग्रह 'जीवनसंगीत' याच्या प्रस्तावना पहा) पण काव्यात कोंकणी शब्दांचा भावानुकूल आणि अर्थानुकूल उपयोग करून त्यांचा अर्थ तळटीपांत दिला तर काव्याच्या आस्वादांत बिघाड उत्पन्न होण्याचे कारण नाही.''

पाध्येंसारख्या साहित्यबाह्य विसंवाद टाळून बद्ध प्रतिभेपेक्षा मुक्त प्रतिभेवर अधिक श्रद्धा बाळगणाऱ्यांकडून तसेच साहित्यावर मनसोक्त प्रीती करणाऱ्यांकडून अशाच आवाहनाची अपेक्षा असते. गंमत अशी की, काही काळानंतर मराठी वाचकांपुरते बोलायचे झाल्यास त्यांना या कोंकणी भाषेतील काही शब्दांचे अपरिचितपण जाणवत राहिले नाही. 'स्पर्शाची पालवी' या गो. वि. करंदीकरांच्या लघुनिबंधाचा प्रथम परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे.

'अजून संध्याकाळ रेंगाळते आहे, तिला पृथ्वीचा स्पर्श सोडवत नाही. तिचे सोनरेशमी हात पृथ्वीच्या गळ्यात अडकले आहेत. तिच्या स्पर्शाने वाळूसुद्धा शहारली आहे. आज माड मोरपिसे आहेत..'

प्रश्न असा की आज वामन मल्हार असते तर त्यांनी पूर्वी घेतला तसा आजही तो आक्षेप घेतला असता का?

मध्यवर्ती मराठी काव्यातील प्रत्येक नवीन वळण व पंथानुयायीपण गोव्यातील कवींनी स्वीकारले, असे झाले नाही. बोरकरांनीही काही प्रमाणात मुक्तछंदातील लेखनासाठीचा किंचित प्रयत्न केला. या संदर्भात काऱ्यांच्या काव्यलेखनाचे द्वितीय रचनावैशिष्ट्य ठसठशीतपणे जाणवते. ते म्हणजे काऱ्यांच्या कवितेला त्या नवीन वळणांचे अप्रूप वाटले नाही. परंतु काऱ्यांना आधुनिक मराठी कवितेचा परिय होता. या संदर्भात बाकीबाब बोरकरांची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरते. बोरकर म्हणतात,

''त्यांना आधुनिक कवितेची जाण त्या वयातही फार चांगली होती. त्यांच्याकडून मी केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज, टिळक आणि विनायक यांची कविता आणली आणि वाचली. तशी त्यातली बरीचशी कविता मला लगेच पाठ झाली.''

(पुढे धारवाडातील ज्या विद्यालयात केशवसुत अध्यापन करीत असत त्या विद्यालयात बोरकर अध्ययन करू लागले.)

पार्श्वभूमीवर काऱ्यांची कविता सौंदर्यवादी धाटणीची का, या विषयीचा कयास करता येतो. तिने आपली वाट व्रतस्थपणे चोखाळली. गोव्याच्या मराठी कवितेतील परिवर्तने १९७० नंतरच्या काळात दिसतात. तोपर्यंत काऱ्यांच्या कवितेचे स्वरूप निश्चित झाले होते. जे जे आदर्श वाटते, जे जे उदात्त वाटते, जे जे उन्नत वाटले

ते काऱ्यांच्या चित्ताला स्पर्श करीत असते. मडगाव येथील गोमन्त विद्या निकेतन या संस्थेचा अमृतमहोत्सव १९८७ मध्ये साजला झाला. त्यावेळी 'संस्कृतिविकास पुष्पमाला' नामक व्याखानमाला आयोजित करण्यात आली होती. काऱ्यांनी 'कालिदासाचे शाकुन्तल' या विषयावर विद्वत्तापूर्ण व्याख्यान दिले होते. गोव्यातील निष्ठावंत शिक्षक प्रा. बाळकृष्ण वामन सावर्डेकर यांच्या जीवनाशी संबंधित 'गोमंतकाची भाषा' या शीर्षकाचे एक संपादित पुस्तक प्रकाशित करण्यात आले होते. कारे यांनी सावर्डेकरांच्या संस्कारसंपन्न व्यक्तिमत्वाशी निगडीत असे वर्णन करणारा लेख लिहिला होता. त्यांना परंपरा व संस्कृती यांचे जे आकर्षण वाटत होते, ते विविध कारणपरत्वे आविष्कृत होते असे. कारे त्यांच्या वृत्ती – प्रवृत्तींशी प्रामाणिक राहिले, ते असे.

मात्र काऱ्यांचा परिवर्तनांना विरोध होता, असे म्हणवत नाही. १९६२ या वर्षी गोव्याची राजधानी पणजी येथे गोमंतक मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन झाले होते.त्या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदावरून कारे यांनी भाषण केले होते. गोव्याला पोर्तुगीजांच्या अधिसत्तेपासून लाभलेल्या मुक्तीमुळे मराठी साहित्याच्या निर्मितीला समृद्ध स्वरूपाची चालना मिळू शकेल असे ते त्यावेळी म्हणाले होते.

काऱ्यांनी केवळ काव्यलेखन केले असे म्हणता येत नाही. त्यांनी अभ्यासपूर्ण लेख लिहिले. त्यांनी 'घनः श्याम सुंदरा' ही मराठीतील सुप्रसिद्ध भूपाळी गोमंतकीय कवी विठ्ठल केरीकर यांनी लिहिली असून, तिचे स्वामीत्व होनाजी बाळा या कवीला देता येत नाही, असे एका लेखाद्वारे साधार सिद्ध केले. (या लेखाच्या बाबतीत आणखी एक वदंता होती ती अशी : हा लेख काऱ्यांनी एका संशोधकाला सुवाच्च अक्षरांत लिहिण्यासाठी दिला. तर त्याने तो लेख स्वतःच्या नावावर प्रसिद्ध केला! मग काऱ्यांनी मौनात बोलू दे नीज हृदया असे न म्हणता त्याच्या संशोधनाचा बुरखा फाडला. त्यावेळी त्यांचा आविर्भाव नेहमीच्या कवीच्या भूमिकेतला नव्हता!!)

हार्पर ली ('टु किल अ मॉकिङ्गबर्ड) आणि मागरिट मिचेल ('गॉन व्युइथ द विण्ड') यांच्यासारखी काही नावे आहेत, ज्यांच्या नावावर एकच पुस्तक असले तरी ते लेखक साहित्यिक विश्वात अमर राहिले. तद्वत मराठीतही कविवर्य दा. अ. कारे यांच्या संदर्भातही म्हणता येईल. एकच कवितासंग्रहाद्वारे स्वतःचे काव्याच्या इतिहासातील स्थान अढळ ठेवणारा कवी विरळाच!

●●●